पोलीस उप आयुक्त(प्रकटीकरण)
गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

-: प्रेसनोट :- दिनांक - २४/०६/२०२६

## सरकारी अधिकारी म्हणून बनाव करत असलेल्या तोतया अधिकाऱ्यास गुन्हे शाखेकडून अटक केल्याबाबत.

गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई यांना त्यांचेकडील गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती प्राप्त झाली की, **'एक संशयित इसम वय ४५ वर्षे, हा उपायुक्त या दर्जाचा अधिकारी असल्याचा बनाव करुन, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई येथे कार्यरत असल्याचे खोटे सांगून, तसेच सरकारी अधिकारी वापरत असल्याप्रमाणे अंबर दिवा (beacon Light) असलेली मोटार कार वापर करुन नागरीकांची दिशाभूल व फसवणुक करीत आहे.**

सदर प्राप्त माहीतीचे अनुषंगाने मानवी व तांत्रिक तपास कौशल्याचा वापर करुन सदर संशयीत इसमाचे ठावठिकाण्याबाबत माहीती प्राप्त करुन दिनांक २३/०६/२०२६ रोजी त्यास प्रितम हॉटेल जवळ, पुष्पा पार्क मार्ग क्र.०३, दत्त मंदिर रोड, मालाड पूर्व, मुंबई या ठिकाणी अंबर दिव्यासह असलेल्या होंडा सिटी कारसह ताब्यात घेण्यात आले.

सदर संशयीत इसमाकडे ओळखपत्र, इतर शासकीय संस्थाचे व्हिजीटींगकार्ड, नियुक्ती पत्र, विविध शासकीय यंत्रणा व व्यक्ती यांनी दिलेले ऑथोरायझेशन लेटर्स, शासकीय विभागाचे लेटर हेड, भारतीय राजमुद्रा व इंग्रजी अक्षरात Govt of India असे लिहलेले स्टीकर्स व इतर शासकिय संस्थांची बनावट कागदपत्रे मिळून आली आहेत.

त्याचे विरुध्द गु.प्र.शा.गु.र.क्र. ७१/२०२६ कलम २०४, २०५, ३१८, ३१९, ३३६(२), ३३६(३), ३३७, ३३८, ३४०, ३(५) भा.न्या.सं. २०२३ ( दिंडोशी पोलीस ठाणे गु.र.क्र. ७४६/२०२६) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा, युनिट -३ कडुन सुरु आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मुंबई श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन व मा. सहा. पोलीस आयुक्त, प्रकटीकरण (मध्य) श्री. दिनकर शिलवटे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई चे प्रभारी मिलींद काटे, पोनि लक्ष्मीकांत साळुंखे, पोलीस उप निरीक्षक शंकर शिंदे, पोलीस उप निरीक्षक रोहित बंडगर, पो.ह.क्र. ०४०८८९/बंगाले व चालक पो.ह.क्र.०५०७०८/गावकर यांनी पार पाडली आहे.

Scanned with CamScanner